# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २७ मार्च, २०१५ / चैत्र ६, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५८**

---

### मुंबईतील वांद्रे येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती वैधता प्रमाणपत्र देताना करीत असलेला भ्रष्टाचार

**(१) * ३७७८ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती वैधता प्रमाणपत्र देताना भ्रष्टाचार करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देण्यात येणाऱ्या जात पडताळणी प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर वांद्रे समितीची एसीबीकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर प्रकरणात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही. अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात घ्यावयाच्या निर्णयाबाबत

**(२) * २६६७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामराव वडकुते, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजास आदिवासींच्या सवलती देण्याबाबत ॲडव्हॉकेट जनरल यांचे मार्गदर्शन घेवून १५ दिवसात आदिवासींच्या सवलती लागू करण्यात येतील अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात धनगरांना आदिवासींच्या सवलती देण्यासाठी ॲडव्होकेट जनरलचे मार्गदर्शन घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी समाजाच्या विहित आरक्षणाला बाधा न पोहचता सदर आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नागपूर येथे दिनांक ४.१.२०१५ रोजी झालेल्या एका कार्यक्रमात "धनगर आरक्षणाबाबत सर्वकष विचार करुन कायदा करण्याबाबत महाअधिवक्ता यांच्या समवेत लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल" अशी मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली आहे.
(२) राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांचे समवेत चर्चा झाली असून त्यांचे अभिप्राय व विधी व न्याय विभागाचे अभिप्राय आदिवासी विकास विभागास प्राप्त झाले आहेत.
(३) व (४) सद्य:स्थितीत धनगर समाजाचा समावेश भटक्या जमाती-क या प्रवर्गामध्ये असून त्यांना ३.५ टक्के आरक्षण अनुज्ञेय आहे.

धनगर समाज आणि अनुसूचित जमाती यांना मिळणाऱ्या सवलती खालील प्रमाणे आहेत :-

| **अ.क्र.** | **सवलती** | **धनगर समाज** | **अनुसूचित जमाती** |
|---|---|---|---|
| १ | शासकीय नोकरीमध्ये आरक्षण | ३.५% | ७% |
| २ | शैक्षणिक संस्थेमध्ये आरक्षण | ३.५% | ७% |
| ३ | विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | मिळते | मिळते |
| ४ | आश्रमशाळा सुविधा | उपलब्ध आहे | उपलब्ध आहे |
| ५ | वसतीगृहाच्या सुविधा | उपलब्ध आहे | उपलब्ध आहे |

वरील विवरणावरुन असे दिसून येते की, अनुसूचित जमातीला मिळणाऱ्या सवलंतीसारख्या बहुतांश सवलती धनगर समाजाला मिळत आहेत.

तथापि, वरील चर्चेच्या अनुषंगाने ॲडव्होकेट जनरल यांचे प्राप्त झालेले अभिप्राय व मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार, आदिवासींच्या आरक्षणाला बाधा न पोहोचता धनगर समाजाला आरक्षण कसे देता येईल, ही बाब तसेच या विभागाचा शासन निर्णय क्र.सीबीसी-१०८६/(२०३)/का.१०, दिनांक ५.२.१९८८ अनुसार तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

### अकोला एमआयडीसी मध्ये सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(३) * २९३० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहराच्या एमआयडीसीमधील ७०० पैकी ३०० उद्योग बंद पडलेले असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला शहरातील एमआयडीसीमध्ये गुंतवणूक करण्यास अनेक उद्योजक तयार असून केवळ मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव आणि दप्तर दिरंगाईचा फटका बसल्यामुळे अनेक उद्योजकांनी इतर जिल्हयाच्या वाटा धरल्यामुळे अकोला एमआयडीसीची अधोगती सुरु झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त एमआयडीसीमध्ये सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अकोला औद्योगिक क्षेत्र व अकोला विकास केंद्रात एकूण १७०० भूखंडाचे आरेखन केले आहे. त्यापैकी १३७५ भूखंडांचे वाटप केले आहे. सद्य:स्थितीत ४९८ उद्योग कार्यरत असून, उर्वरित उद्योग अपुरे आर्थिक पाठबळ, बाजारपेठेचा अभाव व व्यवस्थापनातील अडचणी इ. कारणामुळे बंद आहेत.

तसेच अकोला औद्योगिक क्षेत्र महामंडळाकडून मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) अकोला औद्योगिक क्षेत्र व अकोला विकास केंद्रासाठी महामंडळामार्फत डांबरी रस्ते, जल वितरीका, पथदिवे इत्यादी सुविधा पुरविण्यात आले आहेत. तसेच उद्योजकांना विद्युत पुरवठा करण्याच्या दृष्टीने १३२ के. व्ही. व ३३ के.व्ही क्षमतेच्या दोन विद्युत उपकेंद्र उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई,ठाणे जिल्हयातील आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत**

**(४) * ३३७८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी आपल्या विविध मागण्यांबाबत आणि वसतीगृहातील दुरावस्थेबाबत उपोषण आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे आणि याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) राज्यातील वसतीगृहे आणि आश्रमशाळा यांची दुरावस्था संपवण्यासाठी शासनाने धोरण आखले आहे व त्याचे स्वरूप काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अंतर्गत शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी / विद्यार्थीनी त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी दि. ४.१२.२०१४ व दि. १०.१२.२०१४ रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयात आले होते. त्याचप्रमाणे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या अंतर्गत शासकीय

वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात दि. १९.१२.२०१४ रोजी शासकीय मुलांचे वसतीगृह, पनवेल येथे एकत्र येऊन उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे. तथापि अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे हा विभाग वगळता राज्यात इतर ठिकाणच्या शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी आंदोलन वा उपोषण केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) विद्यार्थ्यांच्या मागण्या या प्रामुख्याने आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. ११ नोव्हेंबर, २०११ मधील तरतुदीनुसार सोयी-सुविधा पुरविण्याशी संबंधित आहेत.

(३) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अधिनस्त ७ प्रकल्प कार्यालयांतर्गत असलेल्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. ११ नोव्हेंबर, २०११, शासन शुध्दीपत्रक दि. १०.४.२०१३ व शासन शुध्दीपत्रक दि. २९.६.२०१३ नुसार सोयी-सुविधा पुरविण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावर केली जाते.

भाडयाच्या इमारतीमध्ये सुरु असलेल्या वसतीगृहांमध्ये शासनाच्या निकषाप्रमाणे सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जागेअभावी मर्यादा येतात. सदर बाब वगळता इतर आवश्यक सर्व मुलभूत सोयी-सुविधा शासन निकषाप्रमाणे पुरविण्यात येत आहेत. त्याकरीता आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) शासकीय वसतीगृहे व शासकीय आश्रमशाळांकरीता शासकीय अथवा खाजगी जमीन संपादित करुन त्यावर इमारत बांधण्याचा कार्यक्रम सुरु आहे, जेणेकरुन निवासी विद्यार्थ्यांना वसतीगृहात व आश्रमशाळेत जागेअभावी येणाऱ्या अडचणी दूर होऊन सर्व सोयी-सुविधा उपलब्ध होऊ शकतील. आश्रमशाळेतील मुलांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. २१ डिसेंबर, २००९ नुसार जेवण तसेच भौतिक व शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी ३७ वैद्यकीय पथकांची स्थापना केलेली आहे. आश्रमशाळेतील स्वच्छतेसाठी "स्वच्छ भारत - स्वच्छ आश्रमशाळा" ही मोहिम युनिसेफच्या सहकार्याने दि. ११.३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सुरु केली आहे.

-----------------

**वसईतील (जि.पालघर) संजय गांधी निराधार योजनेतील ३०० लाभार्थ्यांची झालेली उपासमार**

**(५) * ४०८६ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईतील (जि.पालघर) तहसिलदार कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना कार्यालयाच्या मनमानी कारभारामुळे सुमारे ३०० गोरगरीब लाभार्थ्यांना गेल्या जून, २०१४ या महिन्यापासून आर्थिक लाभ मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने ३०० लाभार्थ्यांना त्यांचे थकित लाभ तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील संजय गांधी योजना समितीने दि. १९/६/२०१४ रोजीच्या बैठकीत एकूण १४३ अर्जांपैकी १२१ अर्ज मंजूर केले व उर्वरित २२ अर्ज कागदपत्रांचे पूर्तता अभावी/निकष पूर्ण करीत नसल्यामुळे नामंजूर केले.

तद्नंतर संजय गांधी योजना समितीचा बैठक दि. ४/३/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली. या बैठकीत माहे जुलै, २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीत प्राप्त झालेल्या एकूण ३१८ अर्जांपैकी २२७ अर्ज समितीने मंजूर केले व ९१ अर्ज नामंजूर केले.

संजय गांधी योजना समितीची बैठक जुलै, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत विधानसभा निवडणूक आचारसंहिता तसेच पालघर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आचारसंहिता तसेच अन्य कारणांमुळे आयोजित करता आली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, माहे जून, २०१४ रोजीच्या संजय गांधी योजना समितीच्या बैठकीत मंजूर केलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान माहे जून २०१४ पासून सुरु करण्यात आले आहे. तसेच माहे मार्च, २०१५ मधील बैठकीत मंजुरी दिलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान सुरु करण्यासाठी कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## शेंद्रा व वाळूज (औरंगाबाद) एम.आय.डी.सी. प्रशासनाने लघुउद्योजकांना जागा देण्यासाठी दोन वर्षापूर्वी मागविलेल्या अर्जाबाबत

**(६) * ३९३४ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेंद्रा व वाळूज (औरंगाबाद) मध्ये लघुउद्योजकांना जागा देण्यासाठी एम.आय.डी.सी. प्रशासनाने दोन वर्षापूर्वी लघुउद्योजकांकडून अर्ज मागविले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अर्जानुसार लघुउद्योजकांना लहान औद्योगिक प्लॉट देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात ऑक्टोंबर २०१० पासून ऑनलाईन अर्ज सेवा सुरु असल्यामुळे एकूण ११४६ अर्जदारांनी ऑन लाइनद्वारे भूखंडाची मागणी केली होती. परंतू, सदर क्षेत्रात भूखंड वाटपास उपलब्ध नसल्यामुळे सदर अर्जदारांना अतिरिक्त शेंद्रा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड घेण्यास संमती आहे काय, अशी विचारणा करण्यात आली होती.
(२) अतिरिक्त शेंद्रा औद्योगिक क्षेत्राकरीता संपादित केलेल्या जमिनीवर केंद्र व राज्य शासनामार्फत संयुक्तिक दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर हा प्रकल्प राबविण्यात येणार असल्यामुळे सदर क्षेत्रामधून जागा वाटप करण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्राप्त झालेले सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेली समाजकार्य महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याबाबत**

**(७) * ३७६८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेली समाजकार्य महाविद्यालये प्रशासनाच्या दृष्टीने अधिक सुसुत्रता यावी याद्दृष्टीने सामाजिक न्याय विभागाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, शासनाने केलेल्या कार्यवाही स्वरुप काय आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) समाजकार्य महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव त्या विभागाकडे सहमतीसाठी पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठा आणि मुस्लिम आरक्षणाला उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती**

**(८) * २८३६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४१६ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा आणि मुस्लिम आरक्षणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयास दिलेल्या स्थगितीसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासाठी करण्यात येणाऱ्या व इतर अनुषंगिक कार्यवाहीचे संनियंत्रण करण्यासाठी मा.मंत्री, शालेय व उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येवून अपिल दाखल करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अपिल दाखल करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, मराठा व मुस्लिम आरक्षणासंदर्भात राज्य शासनाचे धोरण काय आहे, मा.सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात यापूर्वी दिलेले आदेश व आरक्षणाची विहीत केलेली एकूण मर्यादा यानुषंगाने पुढे कोणती कारवाई करणे प्रस्तावित आहे,

(४) नसल्यास, उक्त कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे.

(३) मराठा आरक्षणाबाबत शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षणाबाबत सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, दि.९/१/२०१५ रोजी पारित केला आहे. दि. २१/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशापूर्वी सदर आरक्षणांतर्गत झालेले शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश व शासकीय निमशासकीय सेवेतील नेमणूका अबाधित राहतील असे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच स्थगितीपूर्वी नोकरीकरिता जाहिरात दिली असल्यास सदर प्रवर्गाची पदे मा. उच्च न्यायालयाच्या अंतीम आदेश होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत असेही आदेश देण्यात आलेले आहेत.

मुस्लिम आरक्षणाची बाब शासनाच्या विचाराधीन असून अनुषंगिक बाबी तपासण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आर्थिक मदत करणेबाबत**

**(९) * ३६७३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मध्यवर्ती सह.बँक मर्या, बीड या बँकेवर सन २०११ पासून प्रशासकीय मंडळ कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेला शासकीय भागभांडवली मिळण्यासह इतर आर्थिक मदत मिळणे बाबतचे प्रस्ताव बँकेने शासनाकडे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेचे ठेवीदार आणि जिल्ह्यातील शेतकरी यांचे हित लक्षात घेता जिल्हा बँकेला आर्थिक मदत करणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) बीड जिल्हा बँकेला आर्थिक मदत करण्यास झालेल्या विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, सदर बँकेवर दिनांक ०९.०१.२०१२ पासून प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली आहे.

(२) होय.

(३) बँकेस अर्थ सहाय्य देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) येथील ९० टक्के आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांना**
**शौचालय व न्हाणीघर नसल्याबाबत**

**(१०) * ३६१२ श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील ९० टक्के आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांना शौचालय व न्हाणीघर नसल्याने शौचाला रानात तसेच आंघोळीला नदीवर किंवा विहिरीवर जावे लागत असल्याची बाब जानेवारी, २०१५ मध्ये पहिल्या आठवडयात उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सदरहू आश्रम शाळेची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, किती आश्रम शाळा दुरावस्थेत आहेत,
(४) याबाबत शासनाने संबंधित आश्रम शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

शहापूर प्रकल्पांतर्गत एकुण २३ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. सदर आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणा-या ४०६६ मुलींकरिता १५२ शौचालये व १५० स्नानगृहे उपलब्ध आहेत. तसेच ४८२४ मुलांकरिता १८३ शौचालये व १३२ स्नानगृहे उपलब्ध आहेत.
(२), (३) व (४) सहायक प्रकल्प अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत नियमितपणे शाळांची तपासणी करुन शाळेतील त्रुटींबाबत शेरे नोंद करतात. सदर त्रुटीची पुर्तता करण्यात येते.

शहापूर प्रकल्पातील २३ शासकीय आश्रमशाळांपैकी ७ शाळांचे बांधकाम नवीन टाईपप्लॅननुसार प्रगतीपथावर आहे.

-----------------

**मुंबईतील वांद्रे येथील शासकीय कॉलनीमध्ये एकेका इमारतीसाठी लाखो किंवा कोट्यावधी रुपयांचा खर्च अनेकदा मंजूर करण्याबाबत**

**(११) * ३६३८ श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे येथील शासकीय कॉलनीमध्ये एकेका इमारतीसाठी लाखो किंवा कोट्यावधी रुपयांचा खर्च अनेकदा मंजूर करण्याचे प्रताप सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांनी वांद्रे वसाहतीत केले असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. तथापि, अशा आशयाचे वृत्त दैनिक सकाळ, मुंबई या वृत्तपत्रामध्ये दि. १४ जानेवारी, २०१५ रोजी प्रसिध्द झाले आहे.
(२) याबाबत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.
(३) या चौकशीत कामांची मंजुरी नियमित असल्याचे आढळून आले आहे. तथापि अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांना कामांची तपासणी करुन अहवाल शासनाचा सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

-----------------

**मौजे रिघोरे (ता.माढा, जि.सोलापूर) येथील सीना नदीवरील पुलाचे काम आणि बार्शी-कुर्डूवाडी राज्यमार्ग क्रमांक ७७ चे काम ठेकेदारांकडून संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(१२) * ३७१८ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रिधोरे (ता.माढा,जि.सोलापूर) येथील सीना नदीवरील पुलाचे काम आणि मुंबई-पुणे व पश्चिम महाराष्ट्राकडे जाणा-या बार्शी-कुर्डूवाडी राज्यमार्ग क्रमांक ७७ चे काम ठेकेदारांकडून संथ गतीने सुरु असून सदर कामाची मुदत संपूनही सदर दोन्ही कामे अपूर्ण आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुलाचे तसेच राज्यमार्ग क्रमांक ७७ चे काम मुदतीत न करणा-या ठेकेदारांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदरची दोन्ही कामे तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधीन सीना नदीवरील पुलाच्या कामाची नियोजित मुदत दि. ७.१२.२०१२ पर्यंत होती. तद्नंतर सदर कामास दि. ३०.६.२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि कंत्राटदाराने सदरचे काम मुदतीत पूर्ण न केल्याने त्यावर करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर आहे. सदरचे काम डिसेंबर २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

प्रश्नाधीन बार्शी-कुर्डूवाडी राज्यमार्ग क्रमांक ७७ चे काम खाजगीकरणातंर्गत मंजूर असून, या कामाकरीता उद्योजकास इरादा पत्र देण्यात आले आहे. सवलत करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार उद्योजकाने आर्थिक ताळेबंदची (Financial Closure) कार्यवाही पूर्ण केली नसल्याने अद्याप सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत.

-----------------

**राज्यातील विशेषत: विदर्भातील टोलनाके बंद करण्याबाबत शासनाने घ्यावयाच्या निर्णयाबाबत**

**(१३) * ३८५० श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोलनाके बंद करण्यात येतील असा शासनाने निर्णय घेतला असताना मनसर, काटोल, बोरखेडी, गोडखैरी टोलप्लाझा आदि विदर्भातील टोलनाक्यांना शासनाने दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी परवानगी देवून टोलनाका सुरू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या परिसरात राहणाऱ्या लोकांनी त्याला विरोध करुन टोलनाका बंद करण्याबाबत शासनाला विनंती केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) या महामार्गावर दररोज ५० हजार वाहने ये-जा करीत असतात परंतु टोलनाका सुरू झाल्यामुळे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, हा टोलनाका बंद करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मनसर, बोरखेडी, गोडखेरी हे तीन टोलप्लाझा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली आहेत. काटील टोलप्लाझा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अधिपत्याखाली सुरु आहे.

मनसर व बोरखेडी हे टोलप्लाझा दिनांक १०.११.२०१२ रोजी सुरु करण्यात आले आहे. गोडखेरी टोलप्लाझा दिनांक ०४.१०.२०११ ला सुरु करण्यात आलेला आहे.

काटोल टोलप्लाझा ०४.०५.२०१४ रोजी सुरु करण्यात आलेला आहे.

(२) मनसर व बोरखेडी येथील टोलप्लाझा अन्यत्र हलविणे बाबत स्थानिक नागरीकांनी आंदोलन केले होते.
(३) नाही.
(४) मनसर, बोरखेडी, गोरखेरी हे तीन टोलप्लाझा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणा केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली असून सदर टोलप्लाझा बंद करणेबाबत निर्णय घेणे ही बाब पुर्णतः केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.

काटोल टोलप्लाझावर पथकर वसुलीचा कालावधी दिनांक २८.१०.२०३६ पर्यंत आहे.

-----------------

**एमआयडीसीने वाटप केलेल्या जमिनीवर उद्योजकांनी उद्योग न उभारल्याबाबत**

**(१४) * ११५८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एमआयडीसीने राज्यात एक लाख ५७ हजार ४८८ एकर जमिनीचे वाटप केले त्यापैकी १९ हजार ८८० एकर जमिनीवरील १३ हजार उद्योग फक्त कागदावरच उभे असून प्रत्यक्षात त्या जमिनी उद्योजकांनी बळकाविल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाच वर्षात उद्योग न उभारल्यास उद्योजकांकडून जमिनी ताब्यात घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने चौकशी करुन भुखंड बळकावण्या-या उद्योजकांवर काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राज्यात १,५७,४८८ एकर इतके क्षेत्र संपादीत केले असून महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार रस्ते, मोकळी जागा, सुविधांसाठी लागणारे साधारणपणे ४०% क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रामधून ७८,९४३ एकर क्षेत्राच्या भूखंडाचे वाटप ४९,४७० इतक्या उद्याजकांना करण्यात आलेले आहे. त्यापैकी ३६,४१४ भूखंडांवर उद्योग सुरु आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील वाटप केलेला भूखंड उद्योजकांनी विहीत मुदतीत विकसित केला नाही, महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार संबंधित उद्योजकांना कारणे दाखवा नोटीस देवून भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती - सुरत या महामार्गाचे चौपदरी करणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्याबाबत

**(१५) * ४३१९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती - सुरत या ४८० किलोमीटरच्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणासाठी लागणा-या ९० टक्के जागेचे भूसंपादन पूर्ण झालेले असून केंद्रातून मंजूर रकमेचा रु.८००० कोटीचा पहिला हप्ता देखील मंजूर झालेला असला तरी अमरावती सुरत राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम अद्याप सुरु करण्यात आलेले नाही असे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सदर चौपदरी करणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने काही आराखडा तयार केला आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, तपशील उपलब्ध होण्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदयस्थितीत ९५% भूमीचे नोटीफिकेशन झालेले असून, प्रत्यक्ष ७५ % ताबा मिळाला आहे. सदर काम बी.ओ.टी.तत्वावर प्रस्तावित आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार ८०% जागा ताब्यात आल्याशिवाय काम सुरु करता येत नाही.

(२) सदर काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यात वृध्दांसाठी कायदा असूनही वृध्दांकडे केले जात असलेले दुर्लक्ष

**(१६) * ४३४३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वृध्दांसाठी कायदा असूनही सर्रास वृध्दांकडे दुर्लक्ष केले जात असून कायद्याची अंमलबजावणी करताना वृध्दांसाठी उपलब्ध सरकारी योजनांचा फायदा होत नाही व महिन्याला फक्त ६०० रुपये शासकीय वृध्दाश्रमांतील वृध्दांना दिले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृध्दांना सरकारी योजनांचा पुरेपुर फायदा मिळावा यासाठी कोणती उपाययोजना राबविण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, शासन निर्णय दिनांक २९ डिसेंबर, २०११ अन्वये अनुदानित वृध्दाश्रमातील वृध्दांना महिन्याला रुपये ९०० इतके परिपोषण अनुदान दिले जाते.
(२) शासनामार्फत श्रावणबाळ सेवा योजना (राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना), केंद्रीय अन्नपूर्णा योजना, इंदिरा गांधी निराधार व भुमीहिन शेतमजूर महिला अनुदान योजना (राज्य पुरस्कृत) अशा विविध योजना राबविल्या जातात. तसेच ज्येष्ठ नागरिकांना महानगरपालिका/नगरपालिका रुग्णालयातून विनाशुल्क सेवा दिली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * ४५३१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत ५२६ प्राथमिक व २९८ माध्यमिक आश्रमशाळा चालविण्यात येत आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे ऑक्टोबर २०१४ पासून वेतन अदा केले नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वेळेवर वेतन अदा न करण्याची कारणे कोणती आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही हे खरे नाही.

राज्य शासनातर्फे या विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गाच्या १० प्राथमिक व ८ माध्यमिक, विजाभज प्रवर्गाच्या ५२८ प्राथमिक व २९९ माध्यमिक आश्रमशाळा चालविण्यात येत आहेत.

(२) नाही हे खरे नाही.

राज्य शासनातर्फे चालविण्यात येणा-या आश्रमशाळातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे (कोपरी) व उल्हासनगर येथील आदिवासी वसतीगृहांची झालेली दुरवस्था**

**(१८) * ४५८६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने अनेक योजना आखल्या असून त्याच्यात शिक्षणाबाबत सजगता निर्माण व्हावी त्याचे शिक्षण सुरळीतपणे व्हावे यासाठी वसतीगृह त्याचप्रमाणे सोयी-सुविधासह शैक्षणिक भत्ते सरकारने दिलेले असताना, ठाणे स्टेशनजवळ कोपरी येथील साईनाथकृपा या बिल्डींगच्या सहाव्या व सातव्या मजल्यावरील मुलीचे वसतीगृह तसेच उल्हासनगरमधील सेक्टर ५ मधील गांधी चौकातील एका चाळीत असलेले वसतीगृहात अनुक्रमे ६३ मुली व ५० मुली दाटीदाटीने शासनाच्या कोणत्याही सोयी-सुविधा वाचून शिक्षण घेत असल्याने त्यांच्या नशिबातील वनवास आजही कायम आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू विभागानुसार निवासी भत्ता तसेच स्वच्छता भत्ता दरमहा १०० रुपये देणे आवश्यक असताना या विद्यार्थ्यांना मागील ८ महिन्यांपासून निवासी भत्ता मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू वसतीगृहातील समस्याबाबत दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी (मानवी हक्क दिन) शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चाही काढला होता, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही वसतीगृहातील गैरसोयी व अन्य समस्यांबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह (कोपरी) ठाणे व आदिवासी मुलींचे वसतीगृह उल्हासनगर येथील प्रवेशित मुली शासनाच्या कोणत्याही सोयी-सुविधावाचून शिक्षण घेत असल्याची बाब खरी नाही.

तथापि आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह (कोपरी), ठाणे हे महाराष्ट्र राज्य को.ऑप. मार्केटींग फेडरेशन, मुंबई यांच्या मालकीच्या साईनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी, बिल्डिंग क्र.१ या इमारतीमध्ये ६ व्या व ७ व्या मजल्यावरील ६ सदनिकांमध्ये भाडेतत्वावर सुरु आहे. सदर वसतीगृहात जागेअभावी येणा-या मर्यादा वगळता शासन नियमानुसार सर्व सोयी-सुविधा देण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, उल्हासनगर हे शासकीय इमारतीत सुरु असून सदर इमारतीभोवती आवार भिंतीच्या बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता कार्यवाही सुरु आहे. सदर वसतीगृहात शासन नियमानुसार सर्व सोयी-सुविधा देण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

आदिवासी मुलींचे वसतीगृह (कोपरी), ठाणे व आदिवासी मुलींचे वसतीगृह उल्हासनगर या दोनही वसतीगृहात माहे, फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंत मासिक निर्वाह भत्ता व स्वच्छता भत्ता विद्यार्थीनींना अदा करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अंतर्गत शासकीय वसतीगृहांमधील विद्यार्थी प्रतिनिधी दि. १०. १२.२०१४ रोजी वसतीगृहांतील सोयी-सुविधा व इतर समस्यांविषयी अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या समवेत चर्चा करण्यासाठी आले होते.

(४) व (५) आदिवासी मुलींचे वसतीगृह (कोपरी), ठाणे हे वसतीगृह भाडेतत्वावर सुरु असून वसतीगृहातील जागा पुरेशी नसल्याने मुंबईत इतर ठिकाणी भाड्याची इमारत घेणेबाबत तसेच वसतीगृह बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, उल्हासनगर हे शासकीय इमारतीत सुरु असून सदर इमारतीभोवती आवार भिंतीच्या बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी आश्रम शाळेत मुलांना सोयीसुविधा मिळत नसल्याबाबत

**(१९) * ४७६७ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी आश्रम शाळेत मुलांना सोयीसुविधा मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत आश्रमशाळेची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार तालुक्यातील आदिवासी शाळेत सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) प्रकल्प अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी हे आश्रमशाळेला नियमित भेटी देतात.

(३) व (४) शहापुर प्रकल्पातील मुरबाड तालुक्यात मठ, सासणे, माळ, मोरोशी व खुटल ह्या ५ शासकीय आश्रमशाळा सुरू आहेत. त्यापैकी एक आश्रमशाळा ही भाड्याच्या इमारतीत असुन त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी लागणा-या मुलभुत सुविधा उपलब्ध आहेत. उर्वरीत ४ आश्रमशाळा ह्या शासकीय इमारतीत सुरु आहे. त्याठिकाणी सुद्धा विद्यार्थ्यांसाठी लागणा-या सर्व मुलभुत सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

तथापि, आश्रमशाळा भेटी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटी आश्रमशाळेच्या शेरे नोंदवहीत नोंदवून त्याची पुर्तता करुन घेण्यात येते.

-----------------

**नाशिकच्या आदिवासी विकास भवनावर शिक्षकांनी केलेल्या विविध मागण्यांबाबत.**

**(२०) * ४७८३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागातील आश्रमशाळांमध्ये दहा वर्षापासून रोजंदारावर काम करणा-या साडेतीन हजाराहून अधिक शिक्षकांनी माहे डिसेंबर २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात नाशिकच्या आदिवासी विकास भवनावर विविध मागण्यांसाठी बि-हाड आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आदिवासी विकास विभागातील सर्व रोजंदारी / मानधनावरील कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेणे व आदिवासी विकास विभागांतर्गत होणा-या सर्व भरती प्रक्रिया तात्काळ रद्द करणे असे त्यांच्या मागण्यांचे स्वरुप आहे.

(३) व (४) सदर पदांवर कार्यरत कर्मचा-यांची नियुक्ती विहीत मार्गाने झालेली नसल्याने त्यांना सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात सीसीआयने केलेल्या कापूस खरेदीत**
**मोठया प्रमाणात झालेला भ्रष्टाचार**

**(२१) * ४९०४ श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सीसीआयने (कॉर्टन कार्पोरेशन ऑफ इंडिया) सुमारे १० लाख क्विंटल कापसाची खरेदी केली असून त्यात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याची तक्रार संबंधित पोलीस स्थानकात माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) त्याचप्रमाणे वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील शेतकऱ्यांकडून सीसीआयने (कॉर्टन कार्पोरेशन ऑफ इंडिया) खरेदी केलेल्या कापसात तेथील शेतकऱ्यांना सुमारे ३ टक्क्यांपर्यंत तूट दाखविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर प्रश्न हा भारतीय कपास निगम मर्या, (CC) या केंद्र शासनाच्या नियंत्रणाखालील एजन्सीबाबत असून भारतीय कपास निगमकडे अशा प्रकारच्या गैरव्यवहाराबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हिंगणघाट येथील कापूस खरेदी व त्याचे वजन हे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात व त्यांच्या अधिका-यांच्या उपस्थित नियमानुसार होते. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही तक्रार भारतीय कपास निगत मर्या, यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैभवववाडी-गगनबावडा (जि.कोल्हापूर) येथील रस्त्याचे काम निकृष्ट प्रतीचे झाल्याबाबत**

**(२२) * ४९८३ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी-गगनबावडा (जि.कोल्हापूर) येथील रस्त्याचे काम निकृष्ट प्रतीचे झाले असतानाच सध्या सुरु असलेल्या विजयदुर्ग कोल्हापूर मार्गावरील करुळ ते एडगाव रस्त्याचे डांबरीकरणाचे कामही निकृष्ट प्रतीचे झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत सदर कामाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर रस्त्याचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. प्रश्नांकीत कामांची चौकशी करावी अशी मागणी पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आली आहे.

(२) होय. सदर कामाची तपासणी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

(३) दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांच्या अहवालानुसार सदर कामाच्या लांबीतील कि.मी.७०/०० ते ७२/१०० या साखळी क्रमांकात झालेल्या डांबरी करणाच्या कामाची दुरुस्ती करताना खडबडीत झालेला डांबरी पृष्ठभाग वगळता इतर सर्व डांबरीकरण सर्वसाधारणपणे योग्य झाल्याचे दिसून आले.

सदरची लांबी दोष दायित्व कालावधीत असल्याने कंत्राटदारास स्वखर्चाने करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**विशेष अतिविशेषोपचार रुग्णालयामधील विविध कामाकडे**
**सार्वजनिक बांधकाम विभागाचे होत असलेले दुर्लक्ष**

**(२३) * ५१०५ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशेष अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्वतंत्र कार्यालय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष अतिविशेषोपचार रुग्णालयामधील विविध कामाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे व त्यांचेकडे सर्व तक्रारी प्रलंबित आहेत, यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, माहिती द्यावी त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. तथापि, देखभाल-दुरुस्तीविषयक तक्रारी स्वीकारण्यासाठी पर्यायी व्यवस्था केली आहे.

(२) याबाबत आवश्यक कार्यवाही सा.बां. विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सायन-पनवेल (जि.मुंबई) महामार्गावरील कामोठे येथे उड्डाणपूलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२४)** * **५१९० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल (जि.मुंबई) महामार्गावरील कामोठे येथे उड्डाणपूलाचे काम प्रलंबित असल्याने या महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढल्यामुळे सदरील पूलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याची मागणी कामोठे येथील नागरीकांनी दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरील पूलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केव्हापर्यंत उक्त पूलाचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

कामोठे येथील उड्डाणपुलाचे काम पुर्ण झाले आहे व त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अजिंठा लेणीकडे जाणाऱ्या औरंगाबाद-जळगांव महामार्गाची झालेली दुरवस्था**

**(२५)** * **५४५१ श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा लेणीकडे जाणाऱ्या औरंगाबाद-जळगांव महामार्ग अरुंद तसेच ठिकठिकाणी खड्डे व गोळेगाव नजीकच्या पुलांवरील कठडे तुटलेले असल्याने या महामार्गावर अपघातात भर पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावर मागील ११ महिन्यामध्ये ४३ जणांना कायमचे अपंगत्व आले असुन २८ जणांचा मृत्यू झाला आहे तरी देश-विदेशातील पर्यटकांच्या सोयीकरिता सदरहू महामार्गाचे चौपदरीकरण करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे हे पाहता शासन त्वरीत कोणती आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) असल्यास, या मार्गावरील खड्डे बुजविण्याचे व कठडे दुरुस्तीचे काम करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) सदर महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणा अंतर्गत निविदा स्तरावर आहे.
(३) मोठ्या वहातुक वर्दळीमुळे व नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे पडलेले खड्डे बुजविण्याचे काम प्रगतीत आहे. तसेच पुलाचे क्षतिग्रस्त झालेल्या कठड्याचे काम निधी निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**किनवट-नांदेड तालुक्यातील राज्य मार्ग १० च्या मार्गावरील कामात झालेला गैरव्यवहार**

**(२६) * ५५०० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील प्रमुख राज्य मार्ग १० च्या वरील खड्डे बुजविण्याच्या व डांबरीकरण करण्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात येवून लाखो रुपयांचा गैरव्यहार करण्यात आल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी केंद्र आणि राज्य सरकारने सुरु केलेल्या शिष्यवृत्तीत झालेला गैरव्यवहार**

**(२७) * ५५३६ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी केंद्र आणि राज्य सरकारने सुरु केलेल्या शिष्यवृत्ती योजनेवर काही शिक्षण सम्राटांनी भ्रष्टाचार केल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची फसवणूक केल्याबाबत आतापर्यंत किती संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, कारवाईस होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांनी केलेल्या चौकशीमध्ये गडचिरोली प्रकल्पांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील ९ महाविद्यालयांमध्ये शिष्यवृत्ती योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांनी गडचिरोली प्रकल्पांतर्गत महाविद्यालयांमधील शिष्यवृत्ती योजनांच्या गैरव्यवहाराबाबत प्राथमिक चौकशी केलेली आहे.
(३) व (४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीनुसार ९ महाविद्यालयांवर फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत.

गडचिरोली प्रकल्पातील शिष्यवृत्तीतील गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क योजनांची सखोल चौकशी करावी तसेच गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना आयुक्त, आदिवासी विकास यांना शासन पत्र दि. २०.०१.२०१५ अन्वये दिलेल्या आहेत.

सदर गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार शिष्यवृत्ती योजनांमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथक स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव गृह विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

-----------------

**महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२८) * ५६०५ श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक व उच्च शिक्षणाकरीता महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळामार्फत शैक्षणिक कर्ज पुरवठा करण्यात येत असुन राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अखत्यारितील एनएसएफडीसी ला सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निधी मागितला व त्या बदल्यात निधीबाबत हमीसुध्दा दिली मात्र अद्यापपर्यंत महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाला निधी प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शैक्षणिक हमी प्रकरणात विद्यार्थ्यांना विमा काढावा लागत असून विमा भरणे शक्य होत नसल्याने काही प्रकरणात विमा न काढल्यामुळे काही विद्यार्थ्यांच्या कर्जाच्या रकमा तशाच पडून राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विम्याची जाचक अट रद्द करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, शैक्षणिक कर्जाची प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यात कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) हे खरे नाही, एनएसएफडीसीच्या ध्येय धोरणाप्रमाणे शैक्षणिक कर्ज प्रकरणामध्ये विमा काढणे आवश्यक आहे. परंतु शैक्षणिक कर्ज प्रकरणात विमा न काढल्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या रकमा तशाच पडून राहिलेल्या नाहीत अथवा अशाप्रकारची कोणतीही तक्रार शासनास प्राप्त झाली नाही.

(३) एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्या कर्जाच्या अटी व शर्ती तसेच मार्गदर्शक सूचनाप्रमाणे शैक्षणिक कर्ज योजनेतंर्गत कर्ज वितरण वेळी अर्जदाराच्या नावे विमा काढणे बंधनकारक असून विम्याची अट रद्द करण्याचे अधिकार हे राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त विकास महामंडळास (एनएसएफडीसी) आहेत.

(४) केंद्राकडून (एनएसएफडीसी) निधी प्राप्त झाल्यानंतर शैक्षणिक कर्जाची प्रलंबित प्रकरणे प्राथम्याने निकाली काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रशासकीय सेवेतील अपंगाची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात

**(२९) * ५६४९ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशासकीय सेवेतील (आयएएस) नियुक्त्या व सर्व सरकारी नोक-यांमध्ये अपंगाना ३ टक्के जागा राखीव ठेवणे बंधनकारक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अपंगाच्या ३ हजार जागा रिक्त आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२), (३) व (४) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. ३२९४/२०१०-निलिमा अनंत सुर्वे विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन प्रकरणीच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभागांकडून अपंगांच्या अनुशेषाबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. त्यानुसार सद्यस्थितीमध्ये अपंगांच्या रिक्त पदांच्या अनुशेषापैकी २५५३ पदे भरण्यात आलेली असून, ६१० पदांकरीता जाहिराती देण्यात आलेल्या आहेत. २४७६ पदांचा अनुशेष शिल्लक असून, सदर पदे भरण्याबाबत सर्व संबंधितांकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच विशेष भरती मोहिम राबवून अपंग व्यक्तींचा नोकरीमधील अनुशेष भरुन काढण्यात येईल.

-----------------

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत महाविद्‌यालयातील प्राध्यापकांना नियमित वेतन देण्याबाबत**

**(३०) * ५६९८ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००८-०९ पासून आश्रमशाळांना श्रेणीवाढीने राज्यात १४७ कनिष्ठ महाविद्‌यालयाना जोडण्यात आली आहेत. मात्र या महाविद्‌यालयातील प्राध्यापकांना ६ वर्षापासून वेतन न दिल्याने दिनांक २१ जुलैपासून हे प्राध्याप्रक संपावर गेले असल्यामुळे राज्यातील २५ हजार विद्‌यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राध्यापकांना नियमित वेतन देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) शासन निर्णय दि. २६.०६.२००८ व दि. ३१.०८.२००९ अन्वये राज्यात विजाभज आश्रमशाळेंच्या १४८ कनिष्ठ महाविद्‌यालयांना मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कनिष्ठ महाविद्‌यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदांना उच्चाधिकार समितीची मान्यता नसल्याने वेतन अदा करता आलेले नाही. पदांना मान्यता देण्याचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीस सादर करण्यात आला होता. उच्चाधिकार समितीने दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव मा.वित्त मंत्री आणि मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने उच्चाधिकार समितीस फेरसादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हडपसर ते कवटीवाट टोलनाक्यादरम्यानाच्या रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम रेंगळल्याबाबत**

**(३१) * ५७५४ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सोलापूर महामार्गावरील हडपसर ते कवटीवाट टोकनाक्यादरम्यानाच्या रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम रेंगाळल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम पुर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) कि.मी. ८/८०० ते कि.मी. १२/२०० या लांबीतील महामार्गाच्या अस्तित्वातील कॅरेजवेच्या दोन्ही बाजूस मध्ये पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन आहे. ती हलविण्याबाबत लष्कर पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याशी सतत पाठपुरवठा चालू आहे. सदरच्या पाईप लाईन हलविण्याचे काम झाल्यानंतर रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसतीगृहात प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या महिला गृहपालास कायम करण्याबाबत**

**(३२) * ५७९२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील संत कंवरराम चौक येथील वसतीगृहात २० वर्षीय विद्यार्थीनीची अत्यंत अत्यावस्था एका मुलीला जन्म दिला, त्या विद्यार्थीनी व तिचा नवजात बालिकेला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले असून या गंभीर प्रसंगी उक्त वसतीगृहाच्या गृहपालांनी काळजी घेण्याची गरज असतांना गृहपालकांनी याकडे दुर्लक्ष केल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतीगृहात कार्यरत महिला गृहपाल प्रतिनियुक्तीवर असून एकही गृहपाल कायम नसल्याने अशा प्रकरणी दुर्लक्ष होत असल्याने कायमस्वरुपी गृहपाल देण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशतः खरे आहे.

अमरावती शहरातील, कंवरनगर भागातील आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह क्र.३ येथे प्रवेशित असलेली एक विद्यार्थीनी दि. २९.१२.२०१४ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे प्रसुत झाली आहे, ही बाब खरी आहे. परंतु सदर विद्यार्थीनीला शारीरिक त्रास होत असल्याने महिला गृहपालांनी तात्काळ या विद्यार्थीनीला रुग्णालयात दाखल केले. तसेच विद्यार्थीनीच्या प्रसुतीदरम्यान तिच्यासोबत वसतीगृहाच्या गृहपाल रुग्णालयात हजर होत्या. त्यामुळे गृहपाल यांनी विद्यार्थीनीच्या प्रसुतीवेळ तिची काळजी घेतली नाही व दुर्लक्ष केले, ही बाब खरी नाही.

(२), (३) व (४) अमरावती येथे आदिवासी मुलींसाठी ५०० प्रवेश क्षमतेचे शासकीय वसतीगृह मंजूर आहे. सदरहू वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी गृहप्रमुख-१, गृहपाल-२ व इतर ९ कर्मचा-यांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी गृहपालाची २ पदे व इतर सहायक कर्मचा-यांची पदे भरलेली आहेत. गृहप्रमुख या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य गृहपालांकडे सोपविण्यात आला आहे.

सदरचे वसतीगृह हे मोठया क्षमतेचे असल्याने सदरहू वसतीगृहास एकत्रित स्वरुपात खाजगी इमारत न मिळाल्यामुळे पर्यायी ३ ठिकाणी खाजगी इमारतीमध्ये मुलींची निवास व्यवस्था करण्यात आली आहे. सबब, सदर ३ इमारतीमधील वसतीगृहांसाठी नियमित २ व प्रतिनियुक्तीने २ अशा एकूण ४ गृहपालांची नियुक्ती केलेली आहे. सदरच्या ३ इमारतींपैकी कंवरनगर या भागातील इमारतीमधील १०० मुलींचे व्यवस्थापनासाठी प्रभारी गृहपालाची जबाबदारी जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळेतील स्त्री-अधिक्षीका श्रीमती व्ही.डी.उज्जैनकर यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. नियमित व प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या गृहपाल व इतर सहायक कर्मचा-यांद्वारे मुलींच्या वसतीगृहाचे दैनंदीन कामकाज केले जात असल्याने वसतीगृह प्रशासनाकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे नाही.

-----------------

**राज्यातील अपंगांच्या व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू करण्याबाबत**

**(३३) * ६३२४ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग शाळांमधील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना दिनांक ३१ मार्च, १९८१ पासून लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) परंतु राज्यातील अपंगांना व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या कर्मशाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी राज्याचे वित्तमंत्री यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१४ रोजी व नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासनास पत्र देऊन कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी मा.मंत्री, सामाजिक न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.आयुक्त अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी अपंगांच्या कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाकडे पाठविला, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला अथवा घेणार आहे आणि केव्हापर्यंत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) व (६) होय. प्राप्त प्रस्तावाच्या तपासणीअंती उपस्थित झालेल्या मुद्यांची माहिती आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून मागविण्यात आलेली आहे. सदर मुद्याची पूर्तती झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**आदिवासी विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देणेबाबत**

**(३४) * ५२२० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत ११ वी ते उच्च शिक्षणापर्यंत शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महाविद्यालयांचे मॅपिंग संबंधित काम मास्टेक कंपनीकडून वेळेत पुर्ण न झाल्याने राज्यातील दीड लाखांपेक्षा अधिक आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण संस्था आणि मास्टेक कंपनी व आदिवासी विभागाच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे ही परिस्थिती उद्‌भवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीस विलंब लावणा-या मास्टेक कंपनी, शिक्षण संस्था व संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) आदिवासी विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्ती देणेबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ही ऑनलाईन पध्दतीने संगणक आज्ञावलीद्वारे सन २०१२-१३ पासून वितरीत करण्यात येत आहे. सदर संगणक आज्ञावलीचे कामकाज शासन मान्यतेनुसार मे. मास्टेक प्र.लि. या कंपनीकडून करण्यात येत आहे.

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करिता विभागाकडे नोंदणी झालेल्या महाविद्यालयांची मान्यता, अभ्यासक्रम मान्यता, अभ्यासक्रम कालावधी इ. बाबत खात्री करण्यासाठी व शिष्यवृत्ती रकमेच्या वाटपामध्ये पारदर्शकता येण्यासाठी विभागाद्वारे मॅपींग प्रक्रिया सुरु करण्यात आली. मॅपींग प्रक्रीयेकरीता अनिर्वाय असलेले सिक्युरीटी ऑडीट करुन मॅपींगसह संगणक आज्ञावली जानेवारी, २०१५ पासून सुरु करण्यात आली. त्यानंतर शीघ्रतेने नोंदणी झालेल्या १५,३५१ महाविद्यालयांपैकी १२,९९८ महाविद्यालयांचे मॅपींग पूर्ण झालेले आहे. उर्वरित २३५३ महाविद्यालयांचे मॅपींग प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती या योजनेंतर्गत एकूण १,३५,२३१ विद्यार्थ्यांनी संकेत स्थळावर नोंदणी केलेली असून माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर ६३,२७२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क रकमांचे वाटप करण्यात आलेले आहे. महाविद्यालयांच्या मॅपींग प्रक्रीयेमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क रक्कम देण्यास विलंब होत आहे. तथापि, या प्रक्रियेत झालेला विलंब हा संबंधित संगणक आज्ञावली व मॅपींग प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे झालेला आहे. सदर तांत्रिक अडचणी दूर करण्यात येत आहेत. आदिवासी विभागाकडून महाविद्यालय मॅपींगबाबत व ऑनलाईन अर्जाद्वारे नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती रक्कम तातडीने मंजूर करण्याविषयी प्रकल्प स्तरावरुन महाविद्यालयाकडे पाठपुरवठा सुरु आहे.

-----------------

### पालघर तालुक्यातील बागायती शेतमालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ होणेबाबत

**(३५) * ४६३९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर तालुक्यातील बागायती शेतमालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई ते चारोटी दरम्यान बाजारपेठ व्हावी अशी मागणी स्थानिक शेतकरी वर्गाकडून सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, पालघर तालुक्यातील बागायती शेतकऱ्यांचे होणारे नुकसान पाहता लवकरात लवकर बाजारपेठ होणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही. पालघर येथे कृषि उत्पन्न बाजार समिती असून तेथे शेतकरी व व्यापारी यांचेसाठी सुविधा उपलब्ध आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### अपंग विद्यार्थ्यांच्या शाळांना अनुदान देणेबाबत

**(३६) * ३९४८ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ८८७ शाळा असून सुमारे ४०,००० विद्यार्थी शिक्षण घेतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा अनुदानपात्र करणेसाठी राज्यातील विविध स्वंयसेवी संस्था २००२ पासून प्रयत्न करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळांना अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) राज्यात अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी १५५८ शाळा असून सुमारे ६५७११ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(२) होय.

(३) व (४) विनाअनुदान तत्वावरील अपंगांच्या शाळा / कर्मशाळांना अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**औरंगाबाद विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३७) * ६१५० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात पाच कोटी रुपयांचा बिल घोटाळा झालेबाबत**

**(३८) * २८३७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८४ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागात पाच कोटी रुपयांचा बिल घोटाळा झाल्या प्रकरणी मा.अधिक्षक अभियंता, मुंबई यांना चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.अधीक्षक अभियंता, मुंबई यांच्याकडील अप्राप्त चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत अहवालानुसार कोण-कोण दोषी असल्याचे निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींविरुध्द पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, सदरील चौकशी केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे व यासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(३) चौकशी अहवालाचे अनुषंगाने मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बंद पडलेल्या कापड गिरण्या स्थलांतरीत करणेबाबत

**(३९) * ६२६३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चार कापड गिरण्या नांदगावपेठ आणि बार्शी येथे स्थानांतरीत केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत बंद पडलेल्या इतर कापड गिरण्या कापूस उत्पादक भागात स्थानांतरीत करण्यासाठी शासनाने उच्चाधिकार समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव सारख्या सर्वाधिक कापूस उत्पादक तालुक्यात अशा कापड गिरणी स्थानांतरीत करण्याचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीसमोर आहे काय,

(४) बीड जिल्ह्यातील कापूस उत्पादक भागात कापड निर्मिती करणाऱ्या कापड गिरण्या स्थानांतरीत करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

राष्ट्रीय वस्त्रोदयोग महामंडळाच्या मुंबईतील बंद गिरण्या व बंद होण्याच्या मार्गावर आहेत अश्या गिरण्या राज्यातील कापूस उत्पादक क्षेत्रात स्थलांतर करण्यासाठी येणा-या विविध अडचणी सोडविण्यासाठी समन्वय करण्यासाठी अ.मु.स.(वस्त्रो.) यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समितीची शासन निर्णय दि. ९/२/२०१५ स्थापना करण्यात आली आहे.

(३) व (४) नाही.

राष्ट्रीय वस्त्रोदयोग महामंडळ हे केंद्र शासनाच्या अखत्यारित असून केंद्र शासनाच्या सहमतीने राष्ट्रीय वस्त्रोदयोग महामंडळाचे कामकाज चालते. सदयस्थितीत मुंबईतील बंद गिरण्या बीड जिल्ह्यातील कापूस उत्पादक क्षेत्रात स्थलांतर करण्याबाबतची बाब राष्ट्रीय वस्त्रोदयोग महामंडळाच्या विचाराधिन नाही.

-----------------

## शिरवली (ता.अलिबाग) ग्रामपंचायत हद्दीतील शिरवली-माणकुळे रस्त्यावरील संरक्षण भिंत पडल्याबाबत

**(४०) * ४६८६ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवली ग्रामपंचायत हद्दीतील (ता.अलिबाग) शिरवली-माणकुळे रस्त्यावरील संरक्षण भिंत गेल्या पाच महिन्यापासून पडलेली असल्याने तेथील जनता व वाहनचालकांना अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) ऑगस्ट २०१४ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे संरक्षक भिंतीचा काही भाग कलंडला होता. सदर कलंडलेला भाग त्याच वेळी दुरुस्त करण्यात आला असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावरील वाहतुक सुरळीतपणे सुरु आहे.

सदर पडलेली संरक्षक भिंत मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार बांधणेचे नियोजन आहे.

-----------------

**भिवंडी-ठाणे रोडवरील कशेळी (जि.ठाणे) येथे कल्याण संगम इन्फ्राटेक प्रा.लि.या कंपनीने टोलनाका सुरु केल्याबाबत**

**(४१) * ३६१७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-ठाणे रोडवरील कशेळी येथे कल्याण संगम इन्फ्राटेक प्रा.लि.या कंपनीने टोलनाका उभारुन माहे जानेवारी, २०१५ पासून टोलनाका सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टोलनाक्याच्या विरोधात शेकडो टेम्पो चालकांनी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मोर्चाचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टोलनाका बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

सदर प्रकल्पाकरिता पथकर दि. १७.११.२०११ पासून सुरु करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) दि. ५.१.२०१५ रोजी मोर्च्या दरम्यान प्राप्त निवेदनातंर्गत प्रमुख मागण्या हया शासन परिपत्रकाप्रमाणे ५.०० कि.मी. परिसरातील नागरिकांना टोल वसुली सवलत मिळण्याविषयी, स्थानिक रहिवाश्यांना टेम्पोकरीता म्हणजेच हलक्या व्यापारी मालवाहतूक करणा-या वाहनांकरीता (LCV) पास सवलत मिळाली पाहिजे, रस्त्यावरील खड्डे भरणे तसेच सोयी सुविधा पुरविणे या होत्या.

टेम्पो या वाहन प्रकाराकरिता पास देण्याची तरतूद पथकर अधिसूचनेत नाही.

रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे. करारपत्राप्रमाणे इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याविषयी प्रकलप कंत्राटदारास सुचना देण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात भाकड जनावरे खरेदी प्रकरणी व्यापाऱ्यांना होणारा त्रास**

**(४२) * ३७१४ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भाकड जनावरे खरेदी करुन ट्रक मधून वाहतूक करीत असता विविध संघटनाद्वारे जनावरे वाहून नेणारे ट्रक अडवून नाहक त्रास देत असल्याने व्यापाऱ्यांनी अकलूज येथील आठवडा बाजारावर माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयातील जनावराच्या खरेदी बाजारावर बहिष्कार टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार भाकड जनावरे खरेदी प्रकरणी व्यापाऱ्यांना नाहक त्रास होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. परंतु दि. १५.२.२०१५ पासून भाकड जनावरे खरेदी करणा-या व्यापा-यांनी बाजार समितीच्या आठवडी बाजारामध्ये पूर्ववत भाकड जनावरांची (भारतीय गोवंश सोडून) खरेदी-विक्री सुरु केलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कशेडी घाटातील भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(४३) * ४१६१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणांचे काम सध्या सुरू असून त्याअंतर्गतच कशेडी घाटात १.७२ किलोमीटर लांबीचा भुयारी मार्गाचे काम अंतर्भूत करून सहा पदरी भुयारी रस्ता बांधण्याचा प्रस्ताव प्रस्तावित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित प्रस्तावाबाबत निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यात आली काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या खर्चाबाबत अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे काय, तसेच सदरच्या मार्गाकरिता जमिन संपादनाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, या भूयारी मार्गावर किती खर्च येणार आहे व सदर निधीची तरतूद कशाप्रकारे करण्यात येणार आहे व सदर मार्गाचे बांधकाम केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(५) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) केंद्रशासनाच्या एन.एच.डी.पी. IV अंतर्गत निधीची तरतूद केली आहे. सद्यस्थितीत भुसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) मंजूर सुसाध्यता अहवालानुसार कशेडी येथील भुयारी मार्गाचे कामाकरीता ३५७.४३ कोटी एवढया निधीची आवश्यकता आहे. केंद्रशासनाच्या एन.एच.डी.पी- IV अंतर्गत निधीची तरतूद केली आहे.

एकूण लागणा-या जमिनीपैकी ९० % जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर निविदा प्रक्रीया करून कामास सुरवात करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरातील जडवाहतूक शहराबाहेरुन वळविण्याकरिता**

**(४४) * ५९५१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील जडवाहतूक शहराबाहेरुन वळविण्याकरिता पूर्वीपासून असणाऱ्या कोंडी देगांव रस्त्याच्या मजबूतीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असुन या रस्त्याची दूरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या मजबूतीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने काय कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन रस्ता हा कोंडी देगाव नसून केगांव ते देगाव राज्य मार्ग क्र.२०५ असा असून त्याची लांबी ६.०० कि.मी. आहे. या लांबीपैकी पावसाळ्यात क्षतिग्रस्त झालेल्या १,१०० कि.मी. लांबीतील खड्डे भरून वाहतुक सुरळीत ठेवण्यात आली आहे. सदर रस्त्याच्या आवश्यक लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम निधी, निकष व प्राथम्य क्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथे गुंतवणूकीनुसार उद्योगांमध्ये रोजगार निर्मिती करण्याबाबत**

**(४५) * ५९२७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथील उद्योगांमध्ये तब्बल १३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असताना रोजगार निर्मिती क्षमता केवळ ४ हजार असल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुंतवणूकीनुसार उद्योगांमध्ये रोजगार निर्मिती करण्याबाबत मापदंड निश्चित करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही. अमरावती जिल्ह्यातील अतिरिक्त अमरावती (नांदगाव पेठ) औद्योगिक क्षेत्रातील टेक्सटाईल्स झोनमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग घटक प्रस्तावित असुन ३ उद्योग घटकांना भूखंडाचे वाटप करण्यात आले असुन त्यात ७१३ कोटी रुपयांची गुंतवणुक व १४८७ रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. त्याव्यतिरिक्त टेक्सटाईल्स झोनमध्ये ३ उद्योग घटकांना भुखंड वाटप करण्याचे प्रस्तावित असुन त्यात ५०० कोटीची गुंतवणुक व १९१५ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

याव्यतिरिक्त या औद्योगिक क्षेत्रात मे.भारत डायनॅमिक्स लि.घटकाची ११२७ कोटी रुपयाची गुंतवणुक व १७०० रोजगार निर्मिती प्रस्तावित आहे.
(२) गुंतवणूकीनुसार रोजगाराबाबत मापदंड निश्चित नाहीत. तथापि रोजगार निर्मिती करणे व त्या अनुषंगिक उद्योगात गुंतवणूक करणे या दोन्ही बाबी स्वतंत्र असून या दोन्हीपैकी एका घटकावर आधारित उद्योगांना ठराविक टप्पा गाठल्यानंतर विशाल प्रकल्प दर्जा देण्यात येतो. राज्यात विविध भौगोलिक क्षेत्रांची वर्गवारी अ, ब, क, ड, ड+ अशी करुन यासाठी किमान ड+ या प्रवर्गासाठी रु.२५० कोटी गुंतवणूक अथवा ५०० व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन देणा-या उद्योगास विशाल प्रकल्पांचे फायदे देण्याचे शासनाने घोषित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) वरसोली, चाळमळा आणि माणकुळे येथील पुलांना जोड रस्ता नसल्याबाबत**

**(४६) * ४५३२ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५१७९४ ला दिनांक ७ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात-:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) वरसोली-चाळमळा व माणकुळे येथील पुलांचे कामे होवून येथे अद्यापपर्यंत पोहोच रस्ता झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा रस्ता न होण्याची कारणे काय आहेत,
(३) सदर पूलांना पोहोच रस्ता न झाल्याने नागरीकांना दळणवळण करणे गैरसोयीचे झाल्याने शासन याबाबत कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) मानकुळे धेरंड दरम्यान पुलाच्या जोड रस्त्याकरिता ग्रामस्थांचा विरोध विचारात घेऊन सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात येत असून या करता भूसंपादन व आवश्यक त्या परवानग्या प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

वरसोली व चाळमळा दरम्यान पुलाच्या जोड रस्त्याकरिता भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन राहील.
(३) पोहोच रस्ता झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, पर्यायी रस्ता उपलब्ध असून तो सुस्थितीत आहे.

-----------------

**राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व निर्वाहभत्ता मिळण्याबाबत**

**(४७) * ४७७१ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक आदिवासी विद्यार्थ्यांना गेली २ वर्ष शिष्यवृत्ती व काहींना निर्वाहभत्ता मिळालेला नसल्याने त्याचे शैक्षणिक वर्ष वाया गेले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलभूत सुविधांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांनी तीन वेळा उपोषण करून सुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणतीच कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. विष्णु सावरा :** (१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सन २०१२-१३, २०१३-१४ व सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क देण्याची काही प्रकरणे प्रलंबित आहेत, ही बाब खरी आहे. परंतु राज्यातील शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर पर्यत निर्वाह भत्त्याची सर्व रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

(२) व (३) सन २०१४-१५ या वर्षात रायगड जिल्ह्यातील शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात दिनाक १९ व २० डिसेंबर, २०१४ रोजी पनवेल येथील शासकीय वसतीगृहात शिष्यवृत्ती व वसतीगृहातील सोयी सुविधा निगडित मागण्यांबाबत उपोषण केले होते, हे खरे आहे. तथापि, पनवेल येथील उपोषण वगळता राज्यात इतरत्र कोठेही प्रलंबित शिष्यवृत्ती व निर्वाह भत्त्याअभावी उपोषणाचे प्रकार घडलेले नाहीत.

शासकीय वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ११.११.२०११ नुसार देय सोयी सुविधा देण्यात येत असून माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर पर्यंतची निर्वाह भत्ता रक्कम अदा केलेली आहे.

सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी अथवा तांत्रिक अडचणींमुळे शिष्यवृत्तीचे प्रस्ताव महाविद्यालयीन, तसेच प्रकल्प स्तरावर प्रलंबित असल्यास, संबंधित त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव प्रकल्प कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन २०१४-१५ या वर्षात महाविद्यालयांचे व अभ्यासक्रमांचे मॅपींग प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणींमुळे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क रक्कम देण्यास विलंब झालेला आहे. सदर तांत्रिक अडचणी दुर करण्यात येत असून महाविद्यालय मॅपींगबाबत व ऑनलाईन अर्जाद्वारे नोंदणी केलेल्या विद्यार्थांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क रक्कम तातडीने मंजूर करण्याविषयी प्रकल्प स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**नाशिकरोड ते सिन्नर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(४८) * ४७९३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकरोड ते सिन्नर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे रखडलेले काम लवकर सुरु झाले नाही तर हा प्रकल्पच रद्द करण्याचे निर्देश केंद्रिय भुपृष्ट वाहतुक मंत्रालयाने राज्य शासनाला दिल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिर्डीला जाणा-या भाविकांची संख्या लक्षात घेवून सिन्नर-शिर्डी मार्गाचे चौपदरीकरण करण्याची व या मार्गावर पालखी मार्ग करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची व विविध संघटनांची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील अजंठा घाटातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत**

**(४९) * ५४५२ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील अंजठा घाटातील रस्त्यांची वर्षभर वारंवार दुरुस्ती केली जात असुनही थोड्याच दिवसात काम केल्यानंतर सदरहू घाटमार्गाची दुरवस्था होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील घाटमार्गाच्या कामाचा दर्जा हा निकृष्ट असल्याचे प्रथमदर्शनीच निदर्शनास येत असुनही संबंधित प्रशासन या प्रकरणी चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करीत नसल्याने शासन त्वरीत चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

रस्ता आवश्यक दुरुस्त्या करुन वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात समाजकल्याण विभागामार्फत बीपीएल व नॉन बीपीएल धाकरकांना घरकुल बांधून देण्याच्या योजनेतील अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(५०) * ५६१२ श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात समाजकल्याण विभागामार्फत बीपीएल व नॉन बीपीएल धारकांना घरकुल बांधून देण्याच्या योजनेतील अनेक प्रलंबित प्रकरणांच्या बांधकामास सुरुवात झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ ते २०१४ या वर्षात बीपीएल व नॉन बीपीएलची किती घरकुले मंजूर होऊन पुर्ण झाली आहे व किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली लावून घरकुल बांधकामास गती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०११ ते २०१४ या काळात यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रात एकूण २१५०४ लाभार्थ्यांची निवड झालेली आहे. त्यापैकी १६२६६ लाभार्थ्यांची घरे पूर्ण झालेली आहेत. तसेच नागरी क्षेत्रामध्ये एकूण ५४४ बीपीएल व ५२ नॉन बीपीएल असे एकूण ५९६ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. बीपीएल ५४४ लाभार्थ्यांपैकी २९९ घरे पूर्ण झालेली आहेत. १७६ घरांचे बांधकाम प्रगती पथावर आहेत व उर्वरित १२१ घरांचे काम सुरु होणे बाकी आहे.

(३) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घरकुल निर्माण समिती (नगरपरिषद क्षेत्र) च्या सभेमध्ये रमाई आवास योजनेचा आढावा घेण्यात येऊन घरकुल बांधकामास गती देण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात उत्पादित होणाऱ्या कापसावर राज्यातच प्रक्रिया करण्याबाबत**

**(५१) * ५७८५ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उत्पादित होणाऱ्या कापसावर राज्यातच प्रक्रिया करण्यासाठी उद्योगांना सोयी सवलती देणा-या सुधारित वस्त्रोद्योग धोरणाचा मसुदा मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आला आहे, या धोरणामुळे सुमारे दहा लाख नोक-या आणि ८० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित अंदाज असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी या त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मसुदयावर शासनाने काय निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) व (३) प्रस्ताव अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील महामार्गावर अनधिकृत गाळे बांधण्यात आल्याबाबत**

**(५२) * ४६५२ श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील चिंचणी, वाणगांव, चारोटी, कासा, अहिणे, सारणी या राज्य महामार्गावर अनधिकृत गाळे बांधून सरकारी जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत गाळयांमुळे वाहतुकीला मोठी अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर अनधिकृत गाळे तात्काळ हटविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदरचे अतिक्रमण हटविणेबाबत संबंधित विभागामार्फत कार्यवाही करणेत आली आहे.

-----------------

**अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप केली नसल्याबाबत**

**(५३) * ५९७४ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन २०१४ च्या पाचवे (हिवाळी) अधिवेशन अतारांकित यादी क्रमांक ६ मधील अतारांकित प्रश्न क्र. ५०७२१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या वर्षाची शिष्यवृत्ती माहे डिसेंबर, २०१४ अखेर वाटप करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिष्यवृत्ती वाटप न केल्याने विद्यार्थ्यांना अडचणीला तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिष्यवृत्ती वाटप करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) सन २०१३-१४ मधील अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र व इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे काही अर्ज त्रुटीमुळे तसेच काही अर्ज महाविद्यालयाकडून संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयास सादर न झाल्यामुळे प्रलंबित राहिले आहेत. तसेच सन २०१४-१५ मधील ऑनलाईन शिष्यवृत्तीचे अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरु असल्याने अर्ज प्रलंबित आहेत.
(३) त्रुटीपूर्ततेसह प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयास त्वरित सादर करण्याच्या सूचना संबंधित महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. चालु वर्षाच अर्ज तसेच सन २०१३-१४ मधील प्रलंबित अर्ज सन २०१४-१५ मध्ये मंजूर असलेल्या निधीतून प्राधान्याने निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केंद्र शासनाने साखर निर्यातीवर प्रति टन ६०० ते ७०० रुपयांचे अनुदान देण्याबाबत राज्यशासनाकडे केलेली मागणी**

**(५४) * ४६९४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने साखर निर्यातीवर प्रति टन ६०० ते ७०० रुपयांचे अनुदान द्यावे अशी मागणी राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कोणते प्रयत्न केले,
(३) असल्यास, केंद्र शासनाने राज्य शासनाला कोणते अर्थसहाय्य वा मदत केली आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. अशा स्वरुपाची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.
(२) याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दि.१४/१/२०१५ च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.
(३) साखर उद्योगाला आर्थिक मदत करण्यासाठी केंद्र शासनाने दि.२७/२/२०१५ च्या अधिसूचनेद्वारे १४ लाख टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रति टन रु.४०००/- अनुदान देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.
सदरची योजना अटी व शर्तीनुसार राज्यातील सर्व सहकारी व खाजगी कारखान्यांना लागू आहे.

-----------------

**मुखेड, देगलूर आणि नायगांव (जि.नांदेड) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागातील कामे ठेकेदाराने निकृष्ट दर्जाची केल्याबाबत**

**(५५) * ५८९७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४३३१४ ला दिनांक १९ जुलै, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुखेड, देगलुर आणि नायगांव, जि.नांदेड येथील उपविभागात सन २०११ ते २०१४ या कालावधीत एस.आर.सी.आर.३०५४ खालील कामे हे अत्यंत निकृष्ट दर्जाची केलेली असून सदर कामात नांदेड सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता व वरील संबंधित तालुक्याचे उपअभियंता यांनी ठेकेदारांना हाताशी धरुन अनेक कामे निकृष्ट दर्जाची करून त्यात त्यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासन स्तरावरील गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदर प्रकरणात कोणकोणत्या अधिका-यांचा समावेश आहे,

(३) सदर प्रकरणात दोषी असणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त अहवालानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**सानेगाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(५६) * ४५३३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सानेगाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील आश्रमशाळा बांधकामाबाबत ठेकेदारी निश्चित झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदारांने निविदा शर्तीनुसार अद्याप इमारतींचे काम पूर्ण केले नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा शर्त ३ (सी) खाली ठेकेदारांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे काय,

(४) नसल्यास, कार्यवाही न करण्याची कारणे कोणती ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नाही. तथापि, अधिक्षक अभियंता, रायगड सार्वजनिक बांधकाम मंडळ, नवी मुंबई यांनी संबंधित ठेकेदाराने कामाची प्रगती समाधानकारक न राखल्याने निविदा शर्त क्र. २ अन्वये दंडात्मक कार्यवाही केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपळगाव-नाशिक-गोंदे या सहापदरी महामार्गावरील विविध अपुर्ण कामांबाबत**

**(५७) * ४८०४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव-नाशिक-गोंदे या सहापदरी महामार्गावरील विविध अपुर्ण कामांमुळे तसेच लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या उपाययोजना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या लालफितीतील कारभारात अडकल्यामुळे नाशिक शहरात व्दारका सर्कल, इंदिरानगर इत्यादि ठिकाणी वाहतुक कोंडी होत असल्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नाशिक शहरातील महामार्गावरील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

व्दारका सर्कल व इंदिरा नगर जंक्शन येथील वाहतुक कोंडी सोडविण्याकरीता मंजूर निविदा मध्ये अंतर्भुत नसलेली कामे अतिरीक्त बाब म्हणून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत पुर्ण करण्यात आली आहेत.

तसेच इंदिरा नगर जंक्शन येथील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी कामाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडे मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील वेरुळ लेणी मार्गावरील घाटात बांधलेल्या कठडयांची झालेली दूरवस्था**

**(५८) * ५४५४ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वेरुळ लेणी मार्गावरील घाटात वारंवार अपघात होऊन वाहने कठड्यावर धडकली तर वाहन जागीच थांबणे आवश्यक असते, परंतु येथे वारंवार अपघात होऊन वाहने कठड्याला धडकून कठडे पोकळ असल्याने तुटून गाड्या दरीत कोसळण्याचे प्रमाण अलिकडेच वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेरुळ घाट हा तीन किलोमीटरचा असून घाटात जुने दगडी कठडे आहेत. परंतु, वारंवार दुरूस्तीच्या नावाखाली याच कठड्यांवर सिमेंटचे पोकळ कठडे बांधुन संबंधित विभाग वाहन धारकांच्या जीवाशी खेळत आहे हे पाहता शासन त्वरीत चौकशी करून आवश्यकती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

घाटामध्ये बांधलेले कठडे जुने असून जीर्ण झालेले आहे. औरंगाबाद येथील वेरुळ लेणी मार्गावरील घाटात सन २०१४ मध्ये ४ अपघात झाले असून त्यामध्ये १ अपघातात कठडा तुटून गाडी दरीत कोसळली आहे व त्यामध्ये ३ व्यक्ती जखमी झाले आहेत.

जानेवारी २०१५ मध्ये १ अपघात होऊन ३ व्यक्ती जखमी झाले आहेत.

(२) सदर घाट रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे असून त्यांचे मार्फत दुरुस्ती अंतर्गत घाटातील कठडे बांधण्याचे काम हाती घेण्यात अथवा करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.